**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या काही वर्षात पशुधनात वार्षिक १२ टक्के वाढ झाल्याची केंद्रीय मंत्री राजीव रंजन यांची माहिती
- बिहार विधानसभा निवडणुकांसाठीची अंतिम मतदार यादी आज जाहीर होणार
- गाझा पट्टीत शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या अमेरिकेच्या प्रस्तावाला भारतासह इतर देशांचा पाठिंबा

**आणि**

- आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात, भारत आणि श्रीलंका यांच्यात पहिली लढत

**<><><><><>**

भारताच्या पशुधन क्षेत्रात गेल्या काही वर्षांत वार्षिक १२ टक्के वाढ झाल्याची माहिती केंद्रिय मत्स्य व्यवसाय, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी दिली आहे. ते काल इटलीमध्ये ‘शाश्वत पशुधन परिवर्तन’ या विषयावरच्या दुसऱ्या जागतिक परिषदेत बोलत होते. कृषीपूरक व्यवसायांच्या मूल्यवृद्धीत ३१ टक्के वाढ झाली असून देशाच्या अर्थव्यवस्थेतही ५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. भारत दुग्धोत्पादनात जगात आघाडीवर आहे. पशुधनाच्या लसीकरणाचं राष्ट्रीय गोकुळ अभियान, भारत पशुधन डिजिटल ओळख आणि महिलांच्या नेतृत्वाखाली सहकारी पशुपालन व्यवसाय,01 यासारखे बदल घडवून आणणारे आणि सर्वसमावेशक उपक्रम भारतात सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

नागरिकांचं जीवनमान उंचावण्यासाठी आणि गरीबी निर्मूलनासाठी सरकार अनेक उपक्रम राबवत आहे. शेतकरी केंद्रित धोरणं राबवून पशुधन आणि दुग्धोत्पादन क्षेत्रात सातत्याने वाढ होत असल्याचं राजीव रंजन म्हणाले.

**<><><><>**

एकविसाव्या शतकात सशस्त्र दलांमधली परस्परांबरोबर समन्वय साधून काम करण्याची क्षमता आणि एकता, ही परिचालनात्मक गरज बनली आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं त्री-सेवा परिषदेत बोलत होते. सुरक्षेपुढले धोके गुंतागुंतीचे बनले आहेत, असं ते यावेळी म्हणाले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय हवाई दलानं प्रदर्शित केलेली हवाई संरक्षणामधली एकता उल्लेखनीय होती. या मोहिमे दरम्यान त्री-सेवांमधल्या समन्वयामुळे संरक्षण दलांना वेळेवर आणि अचूक निर्णय घेता आले, असं ते म्हणाले.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दुर्गा पूजा उत्सवानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा उत्सव देशाची संस्कृती, श्रद्धा आणि आध्यात्मिक वारशाचं प्रतीक आहे, अशी भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली. महिलांचा सन्मान राखण्यासाठी आणि समाजात त्यांचं योग्य स्थान जपण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असं आवाहन त्यांनी केलं. तर हा उत्सव प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, आरोग्य आणि शांती घेऊन येवो अशी प्रार्थना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वाटचाल करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं केंद्र सरकार सतत कार्यरत आहे. सेवा पर्व या मालिकेत आज आपण शिक्षण क्षेत्रातल्या सुधारणांबद्दल जाणून घेणार आहोत.

**व्हीसी (१.४० सेकंद)**

*(मागील अकरा वर्षांमध्ये शाळांपासून विद्यापीठांपर्यंत शिक्षण व्यवस्थेला बळकटी आणण्याच्या बाबतीत भारताने वेगानं प्रगती केली आहे. निपुण भारत अभियान, पीएम श्री योजना, राष्ट्रीय अभ्यासक्रम धोरण, राष्ट्रीय क्रेडीट फ्रेमवर्क अशी पावलं उचलून शिक्षण व्यवस्थेमध्ये लवचिकता, बहुशाखीय ज्ञान आणि आंतरराष्ट्रीय स्तर आणायला सरकारने प्राधान्य दिलं आहे. IITs, IIMs आणि AIIMS सारख्या संस्थांचा विस्तार करत सरकारने सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण प्रणालीचा पाया रचला. जुलै २०२० मध्ये सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणलं. यातून शालेय तसंच उच्च शिक्षणात सुधारणा करत तंत्रज्ञानविषयक शिक्षणाचा समावेश केला आहे. याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नवी दिल्लीत युग्म कॉनक्लेवमध्ये म्हणाले)…….*

**होल्ड बाईट मोदी**

*(२०१४ -१५ मध्ये शाळा आणि महाविद्यालयांची संख्या ५१ हजार होती. ही संख्या आता सत्तर हजारांवर गेली आहे. २०१४ पासून एम्सची संख्या सात वरुन २३ वर तर वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या ३८७ वरुन दोन हजारांवर गेली आहे. या सर्व प्रयत्नांमुळे देशाचा युवावर्ग सक्षम होईल आणि भारत एक विकसित राष्ट्र म्हणून स्थापित होईल.)*

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकांसाठीची अंतिम मतदार यादी आज जाहीर होणार आहे. राज्यातल्या विधानसभा निवडणूका याच मतदार यादीच्या आधारावर होतील. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर आज दुपारपर्यंत मतदार याद्या उपलब्ध होतील. मतदार यादीच्या प्रती सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना, आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिल्या जातील. तसंच सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांना देखील अंतिम मतदार याद्या दिल्या

जातील. बिहार मध्ये राबवण्यात आलेल्या विशेष पुनरिक्षण प्रक्रियेनंतर १ ऑगस्ट रोजी मतदार याद्यांचा मसुदा प्रकाशित झाला होता. यामध्ये आपले गणना अर्ज सादर करणाऱ्या ७ कोटी २४ लाखापेक्षा जास्त मतदारांची नावं समाविष्ट करण्यात आली होती.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी सोहळ्यात सहभागी होतील. याप्रसंगी ते टपाल तिकीट आणि विशेष नाण्य़ाचं अनावरण करणार आहेत.

<><><><>

गाझा पट्टीतला संघर्ष थांबवण्यासाठी व्यापक योजना राबवण्याच्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेचं भारतानं स्वागत केलं आहे. हा निर्णय पॅलेस्टिनी आणि इस्राएली नागरिकांसाठी, तसंच  पश्चिम आशियाई प्रदेशासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत शांतता, सुरक्षा आणि विकासाचा व्यवहार्य मार्ग खुला करेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. ट्रम्प च्या प्रयत्नांना  व्यापक पाठिंबा मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. ट्रम्प आणि इस्रायली नेते बेंजामिन नेतान्याहू यांनी मंजूर केलेल्या या योजनेत लष्करी कारवाया तात्काळ बंद करण्याचा प्रस्ताव असून, हमासनं त्याला स्वीकृती द्यावी,  असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. गाझामधल्या शांततेसाठी अमेरिकेनं सुचवलेल्या या योजनेचं युरोपियन आणि मध्य पूर्वेतल्या नेत्यांनी  स्वागत केलं आहे.  भारतासह संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, इजिप्त, जॉर्डन, आणि तुर्कीए या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी संयुक्त निवेदनाद्वारे, ट्रम्प यांच्या प्रयत्नांना पाठिंबा दर्शवला आहे. ब्रिटनचे प्रधानमंत्री  सर केयर स्टारमर, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष  इमॅन्युएल मॅक्रॉन, आणि इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, यांनी

देखील गाझा मधला संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिकेनं सुचवलेल्या योजनेला पाठिंबा दर्शवला  आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतल्या सुधारणा २२ तारखेपासून लागू झाल्या आहेत. त्यात क्रीडा साहित्याबाबत केलेल्या कर सुधारणांविषयी आज जाणून घेऊया…

**होल्ड…कॅप्सूल (४५ सेकंद)**

*(केंद्रसरकारने वस्तू आणि सेवा करामध्ये केलेल्या सुधारणांमध्ये खेळणी आणि क्रीडा साहित्यावरचा वस्तू आणि सेवा कर १२ टक्क्यांवरुन ५ ट्क्क्यांवर आणला आहे.  या सुधारणेमुळे ग्राहक आणि क्रीडा सहित्य विक्रेत्यांना दिलासा तर मिळेलच तसंच स्वदेशी खेळण्यांच्या उद्योगालाही चालना मिळेल. खेळण्यांवरचा जीएसटी कमी केल्यामुळे मुलांना खेळाला प्रोत्साहन मिळेल. खेळण्याचे स्वदेशी उत्पादक हे लघू आणि मध्यम उद्योजक आहेत, त्यांना या कररचनेतील सुधारणेमुळे स्वदेशी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरण्यासाठी बळ मिळेल.*

*वस्तू आणि सेवा कर परिषदेने सायकलवरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्क्यांपर्यंत आणला आहे. यामुळे सायकल परवडणाऱ्या दरात मिळू लागतील यातून फिरस्ते, ग्रामीण भागातल्या व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना फायदा होईल. एवढंच नाही तर पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना मिळेल.)*

**<><><><>**

आज आंतरराष्ट्रीय अनुवाद दिवस साजरा होत आहे. आजचा दिवस, विविध देशांना एकत्र आणून, परस्पर संवाद, आणि सहयोग वाढवण्यात, तसंच विकासामध्ये योगदान देऊन जागतिक शांतता आणि सुरक्षा मजबूत करण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या भाषा तज्ज्ञांच्या कामाप्रति आदरभाव व्यक्त करण्याची संधी देतो. २०१७ साली, संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने ३० सप्टेंबर हा ‘आंतरराष्ट्रीय अनुवाद दिवस’ म्हणून घोषित केला.

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. या स्पर्धेतला पहिला सामना आज भारत आणि श्रीलंका संघांमध्ये गुवाहाटी इथं खेळला जाईल. दुपारी तीन वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारत आणि श्रीलंका या देशांसह ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण अफ्रिका, बांग्लादेश आणि पाकिस्तानच्या महिला संघांमध्ये प्राथमिक फेरीचे २८ सामने होतील.

**<><><><><>**

येत्या २ दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. गुजरामधे सौराष्ट्र आणि कच्छ मध्ये काही ठिकाणी आज जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. अंदमान आणि निकोबार द्वीप समूह, आसाम, मेघालय, छत्तीसगड, आंध्र प्रदेशाचा किनारपट्टी भाग, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि ओदिशामध्ये आज जोरदार पाऊस पडेल, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**//<><><><><>//**